वाचा:- संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.०३ /२०१६ दिनांक १८/११/२०१६.

---

**स्था-१८/ ब / अहवाल शाखा / वलेप अहवाल /न.क्र. १८३/**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा**
**संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**सहावा मजला,कोकण भवन,**
**नवी मुंबई ४०० ६१४**

**स्थायी आदेश क्रमांक ०४ / २०१७ दिनांक - 3 FEB 2017**

**विषय :- ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांचे अहवाल निर्गमनाबाबत.**

**प्रस्तावना:-**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ८ नुसार " लेखापरीक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर व्यवहार्यत: शक्य असेल तितक्या लवकर परंतु त्यानंतर ३ महिन्यापेक्षा उशीरा नसेल अशा मुदतीत लेखापरीक्षा केलेल्या व तपासलेल्या लेख्यासंबंधी एक अहवाल तयार केला पाहिजे व तो संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे व राज्य शासन निदेश देईल त्या अधिका-याकडे व संस्थेकडे पाठविला पाहिजे " तसेच

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४० (१) नुसार ग्रामपंचायतीच्या " लेखापरीक्षेच्या समाप्तीनंतर २ महिन्याच्या आत लेखापरीक्षण अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती व ग्रामपंचायतीकडे पाठविण्यात येईल " अशी तरतूद आहे.

विभागीय सह संचालक कार्यालय / जिल्हा कार्यालय यांचेकडून स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल संबंधित संस्थाप्रमुख (मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गटविकास अधिकारी पंचायत समिती, मुख्याधिकारी नगरपालिका, महानगरपालिका आयुक्त, सरपंच ग्रामपंचायत) यांच्या व्यतिरिक्त मा.सचिव, संबंधित प्रशासकीय विभाग, मा.महालेखाकार मुंबई व नागपूर, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, संचालक व विभागीय सह संचालक कार्यालय, संचालनालयातील सहाय्यक संचालक (पंरास व अहवाल) यांना निर्गमित केले जात होते. सदयस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल online पध्दतीने MAINS प्रणालीद्वारे तयार केले जात असल्यामुळे लेखापरीक्षण अहवालाच्या मूळप्रती उपरोक्त सर्व संबंधितांना पाठविण्याची आवश्यकता नाही. यास्तव संचालनालयाने उपरोक्त वाचा मधील आदेशान्वये "स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण पुर्ण झाल्यानंतर विहित मुदतीत लेखापरीक्षण अहवालाच्या दोन प्रती तयार करुन पहिली प्रत ज्या संस्थेचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे त्या संस्थेस निर्गमित करावी व दुसरी प्रत स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयांनी (जिल्हा कार्यालय / उपविभाग म.न.पा.ले.प.) कायमस्वरुपी जतन करावी व इतर सर्व संबंधितांना लेखापरीक्षण अहवालाची प्रत PDF FILE द्वारे त्यांच्या अधिकृत E-mail ID वर पाठविण्यात यावी " असे आदेशित केले आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

**आदेश:-**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४० (१) नुसार ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण पुर्ण झाल्यानंतर २ महिन्याच्या मुदतीत तसेच मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ८ मधील तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्था, कृषि विद्यापीठे, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सशुल्क व निशुल्क संकीर्ण संस्था यांचे लेखापरीक्षण पुर्ण झाल्यानंतर ३ महिन्याच्या मुदतीत लेखापरीक्षण अहवालाच्या मूळ प्रती (Hard Copies) तयार करुन खालीलप्रमाणे निर्गमित कराव्यात.

**अ) ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत:-**

१. पहिली प्रत ज्या ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण केले आहे, त्या ग्रामपंचायतीस निर्गमित करावी.

२. दुसरी प्रत ज्या स्थानिक निधी लेखापरीक्षा जिल्हा कार्यालयाने लेखापरीक्षण केले आहे, त्या जिल्हा कार्यालयाने कायमस्वरुपी जतन करावी.

**ब) जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत:-**

१. पहिली प्रत ज्या जिल्हा परिषद / पंचायत समितीचे लेखापरीक्षण केले आहे, त्या जिल्हा परिषद / पंचायत समितीस निर्गमित करावी.

२. दुसरी प्रत ज्या स्थानिक निधी लेखापरीक्षा जिल्हा कार्यालयाने लेखापरीक्षण केले आहे, त्या जिल्हा कार्यालयाने कायमस्वरुपी जतन करावी.

३. तिसरी प्रत स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयातील पंचायत राज समिती शाखेस निर्गमित करावी.

**क) नगरपालिका, नगरपालिका शिक्षण मंडळ व नगरपंचायती यांच्या लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत:-**

१. पहिली प्रत ज्या नगरपालिका / नगरपालिका शिक्षणमंडळ / नगरपंचायतीचे लेखापरीक्षण केले आहे, त्या नगरपालिका / नगरपालिका शिक्षणमंडळ / नगरपंचायती यांस निर्गमित करावी.

२. दुसरी प्रत ज्या स्थानिक निधी लेखापरीक्षा जिल्हा कार्यालयाने लेखापरीक्षण केले आहे, त्या जिल्हा कार्यालयाने कायमस्वरुपी जतन करावी.

३. तिसरी प्रत संचालनालयातील महानगरपालिका पुर्नविलोकन शाखेस (लेखापरीक्षण पुर्नविलोकन अहवाल तयार करण्यासाठी) निर्गमित करावी.

**ड) महानगरपालिका, महानगरपालिका शिक्षण मंडळ व महानगरपालिका परिवहन उपक्रम यांच्या लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत:-**

१. पहिली प्रत ज्या महानगरपालिका / महानगरपालिका शिक्षणमंडळ / महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे लेखापरीक्षण केले आहे, त्या महानगरपालिका / महानगरपालिका शिक्षणमंडळ / महानगरपालिका परिवहन उपक्रम यांस निर्गमित करावी.

२. दुसरी प्रत संचालनालयातील महानगरपालिका अहवाल शाखेस निर्गमित करावी.